**GOVINDRAM SEKSARIYAA VANIJYA MAHAVIDYALAYA**
**ALUMNI ASSOCIATION WARDHA**
**(Registered under The Societies Registration Act 1860)**
**Regd. No. – Wardha/0000107/2023**

| Shri Ambikaprasad Tiwari | Shri. Laxman Jajodia | Shri. Sanjay Fulzele |
|---|---|---|
| President | Secretary | Treasurer |


# ज्ञापन

## [Memorandum of Association]

# संस्थेचे उद्देश

1. विद्यार्थ्यांकरीता शैक्षणिक तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणे. जेणेकरून त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होण्यास मदत करणे तसेच विद्यार्थ्यांकरीता मार्गद"ानपर व्याख्यान तसेच विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनविण्याकरीता माजी विद्यार्थ्यांच्या सहायाने प्रयत्न करणे.
2. गो. से. वाणिज्य महाविद्यालयामधून शिक्षित व्यक्ती मोठ्या पदावर गेले असल्यास त्याचे मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित करणे.
3. महाविद्यालय अंतर्गत शिक्षण घेणाऱ्या होतकरू विद्यार्थ्यांना सामाजिक मदत करणे.
4. अतिगरीब विद्यार्थ्यांना दत्तक घेवून त्यांचे शिक्षण पालन पोषण करून उच्चशिक्षित करणे.
5. महाविद्यालयाच्या प्रगतीकरीता योग्य सल्ला देणे व मदत करणे.
6. खेळाचे अयोजन करून होतकरू खेळाडूंना योग्य ती मदत करणे.
7. समाजातील अनिष्ट रूढी व परंपरांचा नायनाट करणे, सांस्कृतिक कला केंद्र स्थापन करणे, गायन, वादन, संगीत कला कार्यक्रम आयोजिणे, सांस्कृतिक कार्यक्रम घेणे.
8. पूरपिडीत, भूकंपग्रस्त, दंगापिडीत असाध्यरोग व इतर नैसर्गिक आपत्तीमध्ये सापडलेल्यांना यथायोग्य मदत व सहकार्य करणे.
9. एडस जनजागरण शिबीर आयोजित करणे, व्यसनमुक्ती केंद्र स्थापित करून व्यसनमुक्ती हेतू प्रचार करणे.
10. अष्टांगयोग, साधना, निसर्गोपचार व आयुर्वेदाद्वारे मानवाचे शारीरिक स्वास्थ, मानसिक शांती, बौद्धिक तथा आध्यात्मिक कल्याण साधणे याकरिता दैनिक वर्ग चालविणे. क्रिडा शिबीरांचे आयोजन करणे, ग्रंथालयाद्वारे ज्ञान प्रसारीत करणे.
11. केंदशासनाच्या व राज्यशासनाच्या योजनांचा लाभ जनतेला देण्याचा प्रयत्न करणे, जसे प्रौढ शिक्षण, आधार योजना, गोरक्षण, सकस आहार योजना इत्यादी कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे.
12. केंदशासनाच्या व राज्यशासनाच्या समाज कल्याण विभागा अंतर्गत येणाऱ्या योजना राबविणे, तसेच ग्रामीण व शहरी लोकांकरिता असलेल्या विकासाच्या योजनांची माहिती व प्रशिक्षण लोकांना देणे वरील सर्व उद्देश हे अव्यावसायिक तत्त्वावर राबविण्यात येईल.

**Address : G. S. College of Commerce, Wardha, Jamanalal Bajaj Marg, Civil Lines, Wardha - 442 001**

**Phone : (07152) 295502** **E-mail : gsalumni@gsccwardha.ac.in**